International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 6 No. 40 September - October - 2025

# भारताच्या स्वातंत्र्य चळवळीत आदिवासी समाजाची भूमिका व योगदान

**प्रा. डॉ. ह. उ. उईके[1], अनिल बाबुराव खंडारे[2]**
[1]*मार्गदर्शक, मराठी विभाग, वसंतदादा पाटील महाविद्यालय, पाटोदा, जि. बीड.*
[2]*संशोधक विद्यार्थी, पीएच.डी. पालि आणि बुद्धीझम विभाग,*
*डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर*
***Corresponding Author – प्रा. डॉ. ह. उ. उईके***
**DOI - 10.5281/zenodo.17657084**

**प्रस्तावना :**

प्राचीन भारतीय इतिहासात आर्य-अनार्यांचा संघर्ष वैदिक काळात घडून आला 1922 मध्ये हडप्पा आणि मोहनजोदडो येथील उत्खननातून द्राविडी संस्कृतीचा शोध लागला आणि वर्तमान काळातही या संस्कृतीचे अस्तित्व भारतातील अनेक भागात दिसून येते. मध्यकालखंडात भारतावर मुस्लीम संस्कृतीचे आक्रमण झाले असताना मध्यभारतामध्ये आदिवासींची राजसत्ता उदयाला आली. गोंडवाना प्रदेशातील आदिवासींच्या राज्यकारभाराची इतिहासकारांनी विशेष नोंद घेतलेली दिसत नाही. त्यामुळे भारताचे मुळ निवासी आणि त्यांच्या ऐतिहासिक कार्याची विशेष दखल इतिहासात दिसून येत नाही. त्यामुळे भारताचे मुळ निवासी व त्यांच्या संस्कृतीचा इतिहास यावर संशोधन करणे आवश्यक आहे.

भारतामध्ये ब्रिटीश ईस्ट इंडिया कंपनीची राजकीय सत्ता येताच कंपनी सरकारने ब्रिटिशांच्या आर्थिक वसाहतीला विकसित करण्यासाठी सामान्य जनतेबरोबर आदिवासींवरही अत्याचार केले. इंग्रजांनी आपल्या फायद्यासाठी आदिवासींचे उदरनिर्वाहाचे साधन असलेली वनसंपदा आपल्या ताब्यात घेण्याचा प्रयत्न केला आणि त्यांच्या वसाहतींवरही आक्रमण केले. त्यामुळे आदिवासी चिडले व त्यांना इंग्रजाविरूद्ध उठाव करावा लागला. आदिवासी भारताचे मुळ निवासी असल्याचे भूमीचे मालक असलेले आदिवासी आणि त्यांच्या जमीनी कपटाने बळकावून त्यांना भूमीहीन करू पाहणारे यांच्यामध्ये जो काही संघर्ष झाला तो आदिवासींच्या स्वातंत्र्याचा लढा होता. त्याही पुढे जावून आपल्याला असे म्हणावे लागते की, अन्याय, अत्याचार आणि शोषणाविरूद्धचा तो लढा होता.

**उद्दिष्ट्ये :**

1. भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील आदिवासी समाजाचे योगदान व भूमिका यांचा अभ्यास करणे.
2. भारताच्या स्वातंत्र्य लढ्यातील दुर्लक्षित आदिवासी समाजाचे क्रांतीकारक यांची माहिती अभ्यासणे.
3. भारताचे स्वातंत्र्य चळवळीत आदिवासी समाज जागृत होता याचा अभ्यास करणे.

**भारतातील स्वातंत्र्य चळवळीतील आदिवासी समाजाची उठावातील भूमिका व योगदान:**

भारतातील आदिवासी समाजाने भारताच्या स्वातंत्र्य चळवळीमध्ये इंग्रजाविरूद्ध अनेक उठाव केले होते त्यातील काही प्रमुख उठाव पुढील प्रमाणे आहेत.

**1) भिल्लांचा उठाव :**

भिल्ल ही आदिवासी जमातीपैकी एक जमात आहे. भिल्लांनी इंग्रजाविरूद्ध अनेक उठाव केले. इंग्रजांनी साम, दाम, दंड, भेद नीतीचा अवलंब केला. वेळ प्रसंगी आमिषे दाखविली. त्यांच्या उपजीविकेची सोय केली. त्यांची स्वतंत्र पलटण उभारली. तरीही भिल्लांनी आपल्या नायकांच्या नेतृत्वाखाली बंड उभारले. एका नायकाला अटक केल्यानंतर तेथे दुसरा नायक नेतृत्व करून इंग्रजांचे ठाणे जिंकून घेत असे. महाराष्ट्रात इंग्रजाविरूद्ध स्वातंत्र्य उठावाची पहिली ठिणगी भिल्लांनी पेटविली. 1818 ते 1870 पर्यंत विविध उठाव केले. या उठावाचे नेतृत्व खाज्या नाईक, भीमा नाईक, भागोजी नाईक, मेवश्या नाईक, काळू भिल्ल, दौलू नाईक, कान्ह भिल्ल, तंट्या भिल्ल इत्यादींचा समावेश आहे. भिल्लांनी इंग्रज सरकार विरूद्ध 1870 पर्यंत उठाव केला. भागोजी नाईक यांनी इंग्रजांना जेरीस आणले होते. कान्हा भिल्ल व तंट्या भिल्ल यांनी इंग्रज सरकारला जबर टक्कर दिली परंतु, इंग्रजांच्या बंदुकीने भिल्लांचा उठाव दाबल्या गेला.

**2) रामोशांचा उठाव :**

रामोशी ही महाराष्ट्रातील आदिवासी जमात आहे. महाराष्ट्रामध्ये जोपर्यंत मराठी सत्ता अस्तित्वात होती, तोपर्यंत रामोशांच्या सामाजिक व आर्थिक जीवनात राजसत्तेचा हस्तक्षेत नव्हता. परंतु पेशवाईच्या अस्तानंतर इंग्रजांनी शेतकऱ्यांसोबत आदिवासींवरही नविन कर लावले. हलाखीचे जीवन जगत असलेल्या रामोशी मराठ्यांच्या सत्तेच्या काळात लष्कर होते. या जमातीवर चोर, लुटारू, डाकू म्हणून त्यांच्यावर कडक निर्बंध लादण्यात आले. त्यामुळे चिडलेली रामोशी जमात संघटित होऊन, 1822 मध्ये इंग्रजाविरूद्ध लढा पुकारला. कालांतराने रामोशी जमातीचे नेतृत्व वीर उमाजी नाईक यांच्याकडे गेले. त्यांनी सरकारला धारेवर धरले. त्यांनी इंग्रजाचे वर्चस्व झुगारले होते आणि त्यांनी स्वतंत्र राज्य स्थापन करण्याचा प्रयत्नही केला होता. परंतु इंग्रजांनी रामोशाच्या विरूद्ध बळाचा प्रयोग केला आणि उमाजी नाईक यांना कपटाने पकडून 1832 साली फाशी देण्यात आली.

**3) हटकरांचा उठाव :**

बीड जिल्ह्यात मौसाजी हौसाजी नाईकाने इंग्रजाविरुद्ध तीव्र उठाव केला. तो हटकरांचा उठाव म्हणून जगप्रसिद्ध आहे. हटकरांनी नाव्हा येथे इंग्रजांना जबर टक्कर दिली. त्यावेळी इंग्रजांना सुद्धा फार मोठा संघर्ष करावा लागला होता. यामध्ये इंग्रजांची फार मोठी हानी झाली होती. यावरून हटकर जमातीच्या उठावाची तीव्रता आपल्याला लक्षात येते.

**4) संथाळांचा उठाव :**

छोटा नागपूरात स्थायी झालेली संथाल जमात त्यांच्या या भागातील इंग्रजांनी जंगल तोड केली. त्यामुळे संथाल जमातीचे लोक चिडून इंग्रजाविरूद्ध आपले शस्त्र उचलले व त्याला हिंसक स्वरूप प्राप्त झाले. संथाळ लोक ब्रिटीश व त्यांच्या हस्तकांच्या विरोधात एकजूट निर्माण करू लागले होते, ते या सर्वांपासून वेगळे व शोषणमुक्त राहू इच्छित होते. संथाळांच्या उठावांच्या कारणांचे विश्लेषण ई. जी. मैने यांनी खूप सविस्तरपणे केले आहे. ते लिहीतात महाजनांकडून वाढलेले शोषण, कर्जाची समस्या, पोलिसांचा भष्ट्राचार संथाळांची गरीबी आणि ब्रिटीश न्यायालयाकडून संथाळांना न मिळणारा न्याय इत्यादी कारणे या उठावामागे होती. त्याच बरोबर संथाळांच्या

उठावामागच्या कारणांचा आढावा 'कलकत्ता रिव्यु' मध्ये पुढीलप्रमाणे छापलेला होता.

"जमीनदार, पोलिस, महसूल विभाग आणि न्यायालये यांनी संथाळांवर फार मोठ्या प्रमाणात अत्याचार केले. त्यांची जमीनीचे मालमत्ता हिसकावून घेतली. संथाळांना नेहमी अपमानित केले जात होते आणि मारझोड केली जात होती. याचा परिणाम म्हणजे 1854 पर्यंत आदिवासी लोक अन्यायाविरूद्ध संघर्ष करण्यासाठी हालचाली करू लागले. त्यांचे प्रमुख बैठका घेवू लागले आणि संघर्षाची तयारी करू लागले होते. 30 जून 1855 मध्ये भगनीडीमध्ये 400 आदिवासी गावांमधील जवळ जवळ 6000 आदिवासी लोक एकत्र आले. तेथे सभा होऊन एकमुखाने निर्णय घेण्यात आला की, 'बाहेरच्या लोकांना पळवून परकीय सत्ता कायमची संपूवन सत्ययुगातील राज्य न्याय आणि धर्मावर आधारित राज्य निर्माण करण्यासाठी मोठा संघर्ष करावा लागेल.' संथाळांनी मोठा संघर्ष करण्यासाठी आपल्या जमात बांधववांना एकत्र केले आणि कलकत्याकडे जाण्याचा निर्धार केला. परंतु त्यांच्या जवळील पैसा आणि अन्न सामग्री संपली तेव्हा त्यांनी मोठ्या प्रमाणावर लुटपाट सुरू केली. अशा स्थितीमध्ये घाबरलेल्या महाजन लोकांनी पोलिसांच्या मदतीने सिंधू व कान्हूंना पकडण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे संतापलेल्या संथाळांनी मानिक मुंडी, दरोगा व पाच लोकांची हत्या केली. या उठावाची बातमी भागलपूरमधील मॅजिस्ट्रेटला 4 जुलै 1855 ला मिळाली, परंतु 9 जुलै पर्यंत संथाळ त्यांच्या भागात पोहचले होते.

संथाळांच्या या संघटित उठावाने ब्रिटीश सरकार खडबडून जागे झाले आणि त्यांच्याशी लढण्यासाठी सैन्याचा आधार घेतला. उठावातील संथाळांचा बिमोड करण्यासाठी मेजर जनरल लॉयडच्या नेतृत्वाखाली 10 तुकड्या पाठविल्या, उठावाच्या भागामध्ये मार्शल लॉ लागू करण्यात आला आणि विद्रोही नेत्यांना पकडण्यासाठी 10000 रूपयांचे बक्षीस जाहीर केले. भागलपूरचे कमीशनर ब्राऊन आणि मेजर जनरल लॉयड यांनी अत्यंत क्रुरतेने उठाव दडपून टाकला. या दडपशाहीमध्ये 15000 संथाळ मारले गेले व त्यांची गावेच्या-गावे जाळून उध्वस्त केली."

**5) मुंडा उठाव :**

छोटा नागपूर व सिंगभूम या जिल्ह्यात मुंडा आदिवासींचे वस्तिस्थान होते. मुंडा जमातीवर इंग्रजांनी फार अन्याय व अत्याचार करून त्यांच्या जमीनी लुटल्या त्यामुळे मुंडा जमातीचे लोक चिडले व 1831 मध्ये इंग्रजाविरूद्ध मुंडानी उठाव केला. त्यामुळे इंग्रज सरकारला फार मोठी किंमत मोजावी लागली. यामध्ये खुप मोठी जीवीतहानी झाली. त्यातूनच मुंडामध्ये असंतोष पसरू लागला आणि त्याचा परिणाम 1852 मध्ये पुन्हा मुंडा जमातीने उठाव केला. पुढे बिरसा मुंडाच्या नेतृत्वात इंग्रज सरकार विरूद्ध अनेक उठाव करण्यात आले. त्यामुळे हा उठाव बिरसाच्या नावाने ओळखण्यात आला. त्यामध्ये बिरसाने स्वतंत्र जंगल राज्य निर्मितीची घोषणा केली परंतु इंग्रज सरकारने आपल्या सैन्याच्या जोरावर हा उठाव दाबून टाकला.

**6) कोल उठाव :**

छोटा नागपूरमध्ये कोल जमातीचे वास्तव्य होते. ज्या भागात कोल जमात राहत होती तेथे इंग्रजांनी आक्रमण केले. हे आक्रमण कोल जमातीला सहन झाले नाही म्हणून 1827 मध्ये कोल जमातीने इंग्रजाविरूद्ध उठाव केला. परंतु इंग्रजांनी आपल्या शस्त्राच्या जोरावर हा उठाव दाबून टाकला व इंग्रजांनी अनेक आदिवासी लोकांना क्रुर शिक्षा केला होती.

**7) कच्छ मधील उठाव :**

या भागातील आदिवासींनी इंग्रजाविरुद्ध उठाव केला होता. इंग्रज सरकारने कच्छमधील जनतेवर जाचक निर्बंध लादले. हे निर्बंध उठविण्यासाठी 1832 मध्ये एक मोठा उठाव करण्यात आला. त्यामुळे इंग्रज सरकारला आदिवासींच्या दबावाखाली जाहिरनामा प्रसिद्ध करावा लागला. त्यात कच्छमधील आदिवासींच्या सांस्कृतिक भावना दुखावल्या जाणार नाही. याची इंग्रज सरकारने परिपूर्ण काळजी घेऊन त्याची ग्वाही सरकारला आदिवासींना प्रथम द्यावी लागली.

**8) खासी उठाव :**

आसामच्या पर्वतीय प्रदेशामध्ये खासी ही आदिवासी जमात राहत होती. 1828 मध्ये इंग्रज व ब्रम्हदेश यांच्यात युद्ध सुरू झाले. या युद्धामध्ये लष्कराच्या हालचाली गतिशील. होण्यासाठी इंग्रजांनी खासींच्या प्रदेशामध्ये रस्ते बांधणीच्या कामानिमित्त प्रवेश केला. हा त्यांचा प्रवेश खासींना सहन झाला नाही. इंग्रजांना विरोध करण्यासाठी 'तीरथ सिंग' या जमीनदाराने खासींचे नेतृत्व केले. खासींनी 1833 पर्यंत इंग्रजांच्या ठाण्यावर छापे मारण्याचे सत्र सुरू करून इंग्रजांना त्रास दिला होता.

**9) कुकी उठाव :**

मणिपूर भागातील लुशाय टेकड्यांच्या पायथ्याशी कुकी ही आदिवासी जमात वास्तव्यास होती. इंग्रजांचा हस्तक्षेप यांनाही रूचला नाही. त्यामुळे कुकींनी इंग्रजासमोर मोठे आव्हान उभे करून इंग्रजांच्या प्रदेशांवर हल्ले केले. हे हल्ले 1826 ते 1848 पर्यंत सुरू होते. इंग्रजांनी भेदनीतीचा अवलंब करून कुकी लोकांमध्ये फूट पाडून कुकींचे बंड मोडून काढले होते.

**निष्कर्ष :**

भारतातील आदिवासी हे सर्वसाधारण समाजापासून अलिप्त जीवन जगत होते. त्यांचे वास्तव्य पहाडी, भागात, जंगलात होते. शिकार करणे जंगलातील वस्तू गोळा करणे, जगण्यापुरती शेती करणे हा त्यांचा व्यवसाय होता. त्यांच्या जीवन पद्धतीत कोणीही हस्तक्षेप करीत नसे परंतु इंग्रजांनी त्यांच्या जमीनीवर सरकारी अधिकार स्थापन केला त्यांच्यावर अन्याय अत्याचार केले यामुळे आदिवासी समाजात इंग्रजाविरूद्ध चीड निर्माण होऊन त्यांचे रुपांतर हे उठावात होऊन भारताच्या स्वातंत्र्य चळवळीत आदिवासी समाजाचे लाभलेले योगदान स्पष्ट होते.

**संदर्भ ग्रंथ :**

1. मडावी शेषराव एन. 'आदिवासी महानायकाचे चरित्र', सुधीर प्रकाशन, वर्धा, 2019.
2. डॉ. कठारे अनिल, 'ब्रिटिशकालीन भारताचा इतिहास,' एज्युकेशनल प्रकाशन, छ. संभाजीनगर, 2014.
3. www.lbp.world.com
4. https://divyamarathi.bhaskar.com